महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१.
EmailID: supriya.ghotale@gov.in

---

तात्काळ

क्रमांक : पदभ-३१२४/प्र.क्र.२५०/आस्था-८.                दिनांक : ३०.०९.२०२४

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा, नागपूर.

उपायुक्त (आस्थापना),
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.

विषय : जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती २०२३
आरोग्य सेवक (महिला) शैक्षणिक अर्हतेबाबत..

संदर्भ : १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सातारा यांचे क्र.आरोग्य/ आस्था-४/आ.से.भ./२०२४, दि.३०.०८.२०२४ चे पत्र.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अहमदनगर यांचे क्र.जिपना/आरोग्य/ससेपभ/४९८१/२०२४, दि.६.९.२०२४ चे पत्र.
३) उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्तालय, अमरावती यांचे क्र.आस्था/विकास/झेडएनजी/ई-२७२३७४७/२०२४, दि.११.९.२०२४ चे पत्र.
४) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अनौ.संदर्भ दि.२५.०९.२०२४ चे अभिप्राय.

महोदय/ महोदया,

आपले संदर्भीय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.४ येथील अनौपचारिक संदर्भान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-

१) एएनएम, जीएनएम व बीएससी नर्सिंग या अभ्यासक्रमाची पात्रता, कालावधी व अभ्यासक्रम (Syllabus) हे वेगवेगळे आहे. जीएनएम व बीएससी (नर्सिंग) ही शैक्षणिक अर्हता भारतीय परिचर्या परिषदेच्या मार्गदर्शक सुचना व सार्वजनिक आरोग्य विभाग सेवा प्रवेश नियम अधिसूचना दि.२७.०२.२०२१ नुसार अधिपरिचारीका या पदाकरीता आवश्यक आहे व एएनएम ही मुलभुत शैक्षणिक अर्हता एएनएम या पदाकरीता आवश्यक आहे. यास्तव, जीएनएम व बीएससी नर्सिंग ही जरी उच्च शैक्षणिक अर्हता असली व ते एएनएमचे कामे जरी करु शकत असले तरीही मानांकानुसार व सेवा प्रवेश नियम १९६७ अनुसार एएनएम पदाची शैक्षणिक अर्हता ठरत नाही.

२) जीएनएम व बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांची नोंदणी व नुतनीकरण त्या त्या अभ्यासक्रमानुसार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलद्वारे करण्यात येते. तसेच एएनएम अभ्यासक्रम उत्तीर्ण

अभ्यासक्रमाची नोंदणी एएनएम महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलद्वारे करण्यात येते. दोन्ही अभ्यासक्रमांची नोंदणी स्वतंत्र असल्याने जीएनएम पदाकरीता असलेली नोंदणी एएनएम पदाकरीता ग्राह्य धरता येणार नाही.

३) जीएनएम व बीएससी नर्सिंग ही एएनएम पदाकरीता उच्च शैक्षणिक अर्हता असली तरी दोन्ही पदांचे सेवा प्रवेश नियम, कामाचे स्वरुप (कर्तव्ये व जबाबदाऱ्या) भिन्न आहेत. जीएनएम ही जरी उच्च शैक्षणिक अर्हता असली तरी सदर अर्हता एएनएम पदाशी निगडीत नाही. त्यामुळे भारतीय परिचर्या परिषद अभ्यासक्रम, एएनएम पदाचे सेवाप्रवेश नियम व संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र दि.२९.२.२०१६ नुसार एएनएम शैक्षणिक अर्हताधारक व महाराष्ट्र परिचर्या परिषद नोंदणीकृत एएनएम उमेदवार हेच एएनएम पदाकरीता पात्र ठरतात.

२. तरी, यानुसार तपासून नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुढील आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(पं.ख.जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत –
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
निवडनस्ती :- का.आस्था ८.